**प्रेस नोट दि.२५/०३/२०१९**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## <u>१० लाख रुपयांचे खंडणीकरीता अपरहरण केलेल्या अल्पवयीन मुलाची ११ तासांच्या आत पोलीसांनी केली सुटका</u>

---

इसम नामे सोमनाथ तानाजी धनवडे,वय.३०वर्षे व्यवसाय.व्यापार रा.वडाची वाडी ग्रामपंचायत ऑफीसमागे, वडाची वाडी ता.हवेली जि. पुणे यांनी कोंढवा पोलीस स्टेशन येथे येवुन काल दि. २३/०३/२०१९ रोजी सायं. ७/३० वा.चे सुमारास त्यांचा मुलगा नामे.पुष्कराज सोमनाथ धनवडे वय ०२ वर्षे यास कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादींचे घराजवळुन पळवुन नेले होते म्हणुन तक्रार दिलेली असुन त्याबाबत कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्रमांक २८१/२०१९ भादवि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

दाखल गुन्हयाचे गांभीर्य पाहुन कोंढवा पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. अनिल पाटील ,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. महादेव कुंभार व कोंढवा पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी हजर झाले. झालेप्रकाराबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी व गुन्हे शाखा पुणे शहर यांना तात्काळ माहिती देण्यात आली. त्यानंतर मा.श्री.सुनिल फुलारी सो,अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.श्री.प्रदीप देशपांडे,मा.अपर पोलीस आयुक्त सो.गुन्हे शाखा पुणे शहर,मा.श्री. प्रकाश गायकवाड,पोलीस आयुक्त सो.परिमंडळ ५ व मा.श्री. शिरीष सरदेशपांडे,पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे अज्ञात आरोपीचा व अपहारीत बालकाचा शोध घेणेकामी कोंढवा पोलीस स्टेशनकडील अधिकारी,स्टाफ तसेच गुन्हे शाखेकडील अधिकारी व स्टाफ यांच्या वेगवेगळया टिम बनवुन संपुर्ण रात्रभर पुणे शहरातुन बाहेर पडणाऱ्या मार्गावरील लोणी काळभोर,यवत,पाटस इत्यादी ठिकाणी वाहनांची चेकींग करणेत आली.

मध्यरात्रीचे सुमारास अपहारीत मुलगा नामे.पुष्कराज याचे काका लक्ष्मीकांत धनवडे यांचे मोबाईलवर अनोळखी इसमाने फोनवरुन त्याने त्यांचे पुतण्याचे अपहरण केले असुन त्याला सुखरुप सोडुन देण्याकरीता १० लाख रुपयांची खंडणी मागितली. कोंढवा पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी, मुलाचे नातेवाईक असे सर्वजण मिळुन त्याचा उंड्री,पिसोळी, महंदवाडी,हडपसर,हांडेवाडी या परिसरात शोध घेत असताना मुलगा पुष्कराज हा आज सकाळी हांडेवाडी येथील शेतामध्ये सुखरुप मिळुन आलेला असुन त्यास त्याचे पालकांचे ताब्यात सुखरुप देवुन त्याची ११ तासाच्या आत सुटका केली आहे.

मुलगा नामे. पुष्कराज याचे अज्ञात आरोपीने १० लाख रुपयांचे खंडणीसाठी अपहरण केल्याचे प्रथम दर्शनी तपासात निष्पन्न झालेले असुन अज्ञात आरोपींचा शोध घेत आहोत.

सदरची कामगिरी मा.श्री.सुनिल फुलारी सो,अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा.श्री.प्रदीप देशपांडे,मा.अपर पोलीस आयुक्त सो.गुन्हे शाखा पुणे शहर,मा.श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस आयुक्त सो.परिमंडळ ५ व मा.श्री. शिरीष सरदेशपांडे,पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर श्री.समीर शेख,सहा पोलीस आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर,मा.श्री.वाकुटे सो.सहा पोलीस आयुक्त,वाहतुक विभाग अति. कार्यभार वानवडी विभाग,पुणे शहर, यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे श्री.अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,महादेव कुंभार पोलीस निरीक्षक,गुन्हे,पोलीस निरीक्षक गुन्हे शाखेकडील श्री. अंजुम बागवान,दत्ता चव्हाण,अरुण वायकर,रघुनाथ जाधव,सपोनि संतोष तासगावकर,पोलीस उप निरी संतोष शिंदे,विवेक पाडवी,अंकुश कर्चे,पांडुरंग देवकाते,अजय म्हेत्रे,पोलीस हवालदार राजस शेख,इकबाल शेख, विलास तोगे,किरण राणे,पोलीस नाईक जयंत चव्हाण सुशिल धिवार,किरण मोरे,योगेश कुंभार,आदर्श चव्हाण,संजीव कळंबे,पृथ्वीराज पांडुळे,सुरेंद्र कोळगे,उमेश शेलार,उमाकांत स्वामी,अजिम शेख,जगदीश पाटील यांचे पथकाने केलेली आहे.

( अनिल पाटील )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर